नमुना दोन

**जिल्हा शिक्षणाधिकारी यांचे कार्यालय:- शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नंदुरबार**

जिल्हा :- नंदुरबार राज्य :- महाराष्ट्र राज्य

क्रमांक:-जिपनं/प्राशि/खाप्राशा/कावि/RTE/ 417 /2025 दिनांक:- 24/02/2025

**प्राचार्य, पोदार एज्युकेशन ट्रस्ट मुंबई द्वारा संचलित पोदार इंटरनॅशनल स्कूल, सिंधी कॉलनी, तळोदा रोड, नंदुरबार**

**विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम 2011, यांच्या नियम 11,पोट नियम (4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत .........**

**संदर्भ:- आपलेकडील प्रस्ताव दि.16/12/2024**

मी, **शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद नंदुरबार दिनांक** 01/01/2025 पासुन **दिनांक 31/12/2027** पर्यत तीन वर्षाचा कालावधी साठी **इयत्ता 1 ली ते 8 वी च्या करीता पोदार एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई द्वारा संचलित पोदार इंटरनॅशनल स्कूल, सिंधी कॉलनी, तळोदा रोड, नंदुरबार ता. जि. नंदुरबार** या स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील इंग्रजी माध्यमाच्या (C.B.S.E.) शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधिन आहे.**

1.मान्यतेचा कालावधी वाढवुन मिळणार नाही आणि इयत्ता 5 वी ते इयत्ता आठवी नंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परीस्थीतीत कोणतेही बंधन नसेल.

2.बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम 2011 (जोडपत्र दोन) मधील तरतूदीचे शाळा पालन करील.

3. शाळा नजिकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना , पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादेपर्यत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पुर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

4.परिच्छेद 3 निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाचा कलम 12(2) नुसार प्रतिपुर्ती मिळेल. अशी प्रतिपुर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

5.संस्था शाळा कोणत्याही कॅपिटेशन फी वसुल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्यांचा माता पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

6.कोणत्याही बालकांस वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म जात किंवा वंश, जन्म ठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणस्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

7.(एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही विद्यार्थ्यास तो ज्या इयत्तेत असेल त्या इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण होई पर्यत काढुन टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शारिरीक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण होई पर्यत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पुर्ण केलेल्या बालकांस नियम 23 अन्वये निर्धारीत केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग/ विशेष गरजा असलेल्या विदयार्थाच्या अधिनियम तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम 23(1) अन्वये निर्धारित केलेली किमान करणा-या शिक्षकाची नियुक्ती करण्यात येईल, परंतु आणखी असे की अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणा-या शिक्षकांना अशी अर्हता किमान 5 वर्षाच्या कालावधी संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम 24(1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तीची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील, आणि

(आठ) शिक्षकाने/शिक्षीकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवुन घेऊ नये, याची सुनिश्चीती शाळा करील.



EDMI NOTE 11

8.शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमांच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.

9.शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहीत केलेप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विदयार्थ्यांना प्रवेश देईल.

10.शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील.

शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या :-

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ - 102290 **चौ. मी.**
- एकुण बांधकाम क्षेत्र- 19700 **चौ. मी.**
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ- 82590 **चौ. मी.**
- वर्गखोल्याची संख्या - **16 खोल्या**
- कार्यालय -नि- भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली- **04 खोल्या**
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधागृहे-जेथे वापरण्यासाठी व प्रसाधगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल.- **मुले व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे आहेत**.
- पिण्याचा पाण्याची सुविधा- **पाण्याची टाकी (वॉटर फिल्टर)**
- दुपारचे जेवण शिजवण्यासाठी स्वयंपाकघर- **लागू नाही**
- अध्यापन अध्ययन साहित्य/ खेळ व क्रिडाविषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता:- **आहे**
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध. - **आहे**

11.मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परीसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

12.शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

13.शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम 1860 (1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

14.शाळा कोणत्याही व्यक्तिच्या गटाच्या किंवा व्यक्ती संघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरीता किंवा नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

15.शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडुन लेखापरिक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत .प्रत्येक लेखा विवरण पत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-याकडे पाठवण्यात यावी.

16.तुमच्या शाळेला मिळालेला **मान्यता सांकेतांक** (U-DISE No) 27010116904 असा आहे. हा या कार्यालयाशी कोणताही पत्र व्यवहार करतांना तो नमुद करावा याची नोंद घ्यावी.

17.शिक्षण संचालक/ जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेचा शर्तीची निरंतर पुर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दुर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सुचनांचे पालन करावे.

18.संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही कागदपत्र असल्यास नुतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

19.जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती या सोबत जोडल्या आहेत.

24/4/2025

**(वंदना वळवी)**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद नंदुरबार**